CNR MHWR06-001304-2022

## नि.क्र. ६ खालील आदेश

(दि. २३/०२/२०२३)

अर्जदार हिने मुख्य अर्ज कलम १२ कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ अंतर्गत दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जात अर्जदार हिने कलम २३ अंतर्गत अंतरिम पोटगीची मागणी केली आहे.

२. अर्जदार हिचे असे म्हणणे आहे की, गैरअर्जदार क्र.१ सोबत तिचे लग्न दिनांक ०५/०८/२०१८ रोजी कोर्ट मॅरेज पध्दतीने झाले आहे. गैरअर्जदार क्र.१ यांनी त्यांचे घरी लग्नाबाबत काहीही सांगितले नव्हते. परंतु नंतर गैरअर्जदार क्र.१ च्या घरी माहीत झाल्याने त्यांच्या नातेवाईकांनी दिनांक ०१/०१/२०२१ रोजी अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचे लग्न पारंपारीक पध्दतीने लावून दिले. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदारांच्या घरी नांदावयास गेली. तेथे राहत असतांना गैरअर्जदार क्र.१ हे अर्जदाराशी शुल्लक कारणावरुन वाद घालायचे. दरम्यान गैरअर्जदार क्र.१ सोबत असलेल्या वैवाहिक संबंधातून अर्जदार ही गरोदर राहिली. तिने सदरची बाब गैरअर्जदार क्र.१ ला सांगितली असता ते तिला 'तु पागल आहे सायको आहे' असे म्हणत होते. गैरअर्जदार क्र.१ हे तिला नोकरी करण्यास व घराबाहेर निघण्यास मनाई करीत होते. तसेच शेजा–यांसोबत व मैत्रिणी सोबत देखील फोनवर बोलण्यास मनाई करीत होते.

३. अर्जदार हिचे असे म्हणणे आहे की, मार्च २०१९ मध्ये गैरअर्जदार क्र.१ हे त्यांच्या मित्राच्या लग्नात गेले व रात्री उशीरा दारू पिवून घरी आले. त्यावेळी तिने गैरअर्जदार क्र.१ ला त्याबाबत विचारणा केली असता त्यांनी तिचे सोबत वाद करुन तिला घराबाहेर काढून दिले. तसेच दि. २६/०३/२०२१ रोजी गैरअर्जदार क्र.१ हे बाहेरुन घरी आले व जेवण न करता सरळ रूममध्ये निघून गेले. त्यावेळी देखील तिने विचारणा केली असता त्यांनी 'तु मला जेवायला विचारले नाही' असे आरोप करून तिला शिवीगाळ केली आणि डोक्याचे केस पकडून बेदम मारहाण केली. तसेच तिला भिंतीवर ढकलून दिले व त्यामुळे तिला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर दि. २३/०४/२०२१ रोजी अर्जदार हिला गर्भपिशवीतून रक्तस्त्राव सुरू झाल्याने तिला दवाखान्यात भरती करण्यात आले.

त्यावेळी डॉक्टरांनी गर्भाची व्यवस्थीत वाढ न झाल्याने व रक्तस्त्राव होत असल्याने तिला गर्भपात करण्यास सांगितले. त्यावेळी अर्जदार हिचे माहेरील लोक तिला घेवून जाण्यास तयार होते. परंतु गैरअर्जदार क्र.१ यांनी मी सोडून देतो असे म्हणून मित्राच्या मयतीला निघून गेले. त्यावेळी अर्जदार ही तिच्या लहान पुतनी व मैत्रीणीला घेऊन माहेरी गेली. त्यानंतर त्याच रात्री गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार हिला फोन करून तिला मारहाणीची धमकी दिली. तसेच दुस–या दिवशी तिच्या माहेरी येवून तिचे सोबत वाद केला व तिला मारहाण करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर देखील गैरअर्जदार क्र.१ हे अर्जदार हिला नेहमी फोनवर तिला मारण्याच्या व स्वत: विष घेवून आत्महत्या करण्याच्या धमक्या देत होते. तेव्हा पासून अर्जदार हिला नाईलाजास्तव तिच्या आई–वडीलांकडे रहावे लागत आहे.

४. तिने पुढे असे कथन केले आहे की, तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तिचे पालनपोषणाची संपुर्ण जबाबदारी अर्जदारावर आहे, परंतु तो त्यास जाणीवपूर्वक टाळत आहे. अर्जाचा निकाल लागण्यास बराच काळ लागणार आहे. तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. याउलट गैरअर्जदार क्र.१ हे विद्या विकास विद्यालय येथे सहा. शिक्षक म्हणून नोकरी वर असून त्यांना दरमहा रू. ५१,०००/– पगार मिळतो. तसेच गैरअर्जदाराजवळ ८ खोल्यांचे पक्के बांधकाम असलेले वडीलोपार्जित दुमजली मकान आहे. अशाप्रकारे गैरअर्जदार यांची आर्थिक परिस्थिती फार चांगली आहे. अर्जदाराचे पालनपोषणाची संपूर्ण जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ ची आहे. त्यामुळे तिने सदर प्रकरणाचा निकाल लागेपावेतो गैरअर्जदार क्र.१ कडून तिला दरमहा रू. ८,०००/– खावटीची मागणी केली आहे.

५. गैरअर्जदार यांनी नि.क्र.७ नुसार मुख्य अर्जावर त्यांचा जबाब दाखल केला आहे. गैरअर्जदाराने मुख्य अर्जाला दाखल केलेला जबाब सदर अर्जाकरीता मान्य करण्यात येत आहे. गैरअर्जदारांनी त्यांच्या लेखी जबाबात अर्जदार हिने त्यांच्यावर केलेले सर्व आरोप नाकारले आहे. गैरअर्जदारांचे असे म्हणणे आहे की, त्यांनी अर्जदार हिला कोणत्याही आर्थिक छळवणुक किंवा हुंड्याची मागणी केलेली नाही तसेच कौटुंबिक हिंसाचार केलेला नाही. गैरअजदार क्र.१ आज देखील अर्जदाराला ठेवण्यास तयार आहे. गैरअर्जदार क्र.१ शिक्षक असून त्यांच्यावर त्यांच्या म्हातारी आईचे पालनपोषण व औषधोपचार इत्यादी जबाबदारी आहे. अर्जदार हिने त्यांच्या विरुध्द खोटे प्रकरण दाखल

केले असून अर्जात केलेली खावटीची मागणी चुकीची आहे. सबब, अर्जदाराचा अर्ज खारीज करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

६. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. मुख्य अर्ज, प्रस्तुत अर्ज, त्यावरील जबाब व पटलावर दाखल कागदपत्रे पाहिले. अर्जदार हिने सदरच्या प्रकरणात तिने गैरअर्जदारांविरूध्द दिलेल्या प्रथम खबरी अहवालाची प्रत दाखल केली आहे. अर्जदाराने तिच्या मुख्य अर्जात केलेल्या कथनाप्रमाणे प्रथमदर्शनी असे दिसून येते की, अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह दिनांक ०५/०८/२०१८ रोजी कोर्ट मॅरेज पध्दतीने झाले व त्यानंतर त्यांच्या नातेवाईकांनी दिनांक ०१/०१/२०२१ रोजी त्यांचे लग्न पारंपारीक पध्दतीने लावून दिले. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ हे पती–पत्नी असल्याबाबत दोन्ही पक्षात वाद नाही. सदर विवाह आजपर्यंत कायम आहे. त्याचप्रमाणे अर्जदार ही लग्न झाल्यानंतर गैरअर्जदाराकडे नांदण्यासाठी गेली व तेथे एका छताखाली त्यांच्या सोबत राहिली याबाबत देखील दोन्ही पक्षात वाद नाही. तसेच प्रथमदर्शनी असेही दिसून येते की, लग्नानंतर गैरअर्जदारांनी तिला काही दिवस चांगले नांदविले. त्यानंतर गैरअर्जदारांनी तिचा शारीरिक व मानसिक छळ केल्याने ती तिच्या आई–वडीलांकडे माहेरी राहत आहे. अर्जदार यांनी दाखल केलेल्या दस्तावरून असे प्रथमदर्शनी दिसून येते की, तिने गैरअर्जदारांविरूध्द कौटुंबिक हिंसाचाराबाबत तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीमधील सत्यता हा भाग मुख्य अर्जातील गुणवत्तेचा विषय आहे. परंतु असे असले तरी यावरून अर्जदार ही गैरअर्जदारांसोबत एका छताखाली नांदत असतांना गैरअर्जदार क्र.१ यांनी तिचा कौटुंबिक हिंसाचार करून छळ केला असे प्रथमदर्शनी दिसते.

७. अर्जदार हिच्या अर्जावरून प्राथमिक दृष्टया असे दिसून येते की, गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचा कोणतेही कारण नसतांना ती वेगळी राहत असल्यापासून तिचा सांभाळ केला नाही. अर्जदार हिचे असे कथन आहे की, गैरअर्जदार क्र.१ हे विद्या विकास विद्यालय येथे सहा. शिक्षक म्हणून नोकरी वर असून त्यांना दरमहा रू.५१,०००/– पगार मिळतो. तसेच गैरअर्जदाराजवळ ८ खोल्यांचे पक्के बांधकाम असलेले वडीलोपार्जित दुमजली मकान आहे. अशाप्रकारे गैरअर्जदार यांची आर्थिक परिस्थिती फार चांगली आहे. अर्जदार हिने तिचे सदर कथन सिध्द करण्याकरीता माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत गैरअर्जदार क्र.१ च्या पगाराबाबत मागविण्यात

आलेल्या माहितीचे पत्र तसेच गैरअर्जदार क्र.१ च्या नावे असलेल्या शेताचा जमाबंदी पत्रक अभिलेखावर दाखल केले आहे. तसेच गैरअर्जदार यांनी त्यांच्या लेखी जबाबात गैरअर्जदार क्र.१ हे शिक्षक असल्याबाबत स्वत: मान्य केले आहे. अर्जदार हिने दाखल केलेल्या माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत गैरअर्जदार क्र.१ च्या पगाराबाबत मागविण्यात आलेल्या माहितीचे पत्राचे अवलोकन केले असता सन २०२२ या वर्षी गैरअर्जदार क्र.१ यांना एकुण रू. ६२,५५४/– प्रतिमाह पगार मिळत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. यावरुन गैरअर्जदार क्र.१ यांच्याकडे उत्पन्नाचे पुरेसे साधन असून ते अर्जदार हिच्या पालनपोषणास समर्थ असल्याचे दिसून येते. तसेच गैरअर्जदार हे अर्जदार सोबतचे नातेसंबंध मान्य व कबूल करीत आहे. तसेच अर्जदार ही तिच्या माहेरी राहत असल्यापासून गैरअर्जदार यांनी तिच्या पालनपोषणाची जबाबदारी घेतली आहे असे कुठेच नमूद केले नाही व त्यांच्या वकिलांनी देखील युक्तीवादादरम्यान असे नमूद केले नाही.

८. वरील संपूर्ण बाबी पुराव्याच्या आधारे संपरीक्षेदरम्यान गुणदोषावर ठरविता येईल. सद्यास्थितीत पती या नात्याने अर्जदाराचा सांभाळ कराण्याची व तिचे पालनपोषणाची कायदेशीर जबाबदारी गैरअर्जदारावर आहे. अर्जदार ही गैरअर्जदारापासून वेगळी राहत असल्यापासून त्याने तिच्या पालनपोषण किंवा इतर गरजांकरीता कोणत्याही प्रकारे आर्थिक मदत पुरविल्याचे दिसून येत नाही. तसेच गैरअर्जदार क्र.१ यांच्याकडे शेत व घर मालमत्ता देखील आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ हा शारीरिक व आर्थिक दृष्टया अर्जदार हिचा सांभाळ करण्यास प्रथमदर्शनी सक्षम असल्याचे दिसून येते. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदाराच्या पालनपोषणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. म्हणून अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ कडून दरमहा पोटगी मिळण्यास पात्र आहे.

९. वरील चर्चेवरून प्रथम दृष्टया असे निष्पन्न होते की, गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदाराकडे दुर्लक्ष केले आहे. तसेच अर्जदार ही स्वत:चा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. गैरअर्जदार क्र.१ ची शारीरिक प्रकृति, आर्थीक क्षमता व सध्याची महागाई तसेच अर्जदार हिची राहती परिस्थिती व दैनंदिन गरजांकरीता लागणारा खर्च या सर्व बाबी लक्षात घेता, अर्जदार हिला रू. ५,०००/– प्रतिमहा अंतरिम पोटगी मंजूर करणे योग्य होईल. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारती करीत आहे.

## आदेश

१) अर्ज अंशत: मंजूर करण्यात येते.

२) गैरअर्जदार क्र.१ यांनी सदर अर्जाच्या तारखेपासून म्हणजेच दिनांक १२/०५/२०२२ पासून अर्जदार हिला रक्कम रू. ५,०००/– दरमहा अंतरिम पोटगी द्यावी.

३) अर्जदार हिला सदर आदेशाची प्रत विनाशुल्क देण्यात यावी.

BALASAHEB GANGADHAR PAWAR
Digitally signed by BALASAHEB GANGADHAR PAWAR
Date: 2023.03.02 17:30:26 +0530

हिंगणघाट. (बी.जी.पवार)
दि. २३/०२/२०२३ न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(२रे न्यायालय), हिंगणघाट.